# फोंडाघाट महाविद्यालयाला देणगी

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाला कुंबळजाई देवी सामाजिक विकास संस्था कामोठे नवी मुंबई आणि सिद्धगिरी गुरुकुल फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १० जोड बाके, ३५ एकेरी बाके तसेच खुर्च्या देणगी म्हणून देण्यात आले.

या संस्था नेहमी सामाजिकदृष्ट्या मदत करण्यात अग्रेसर असतात. विशेषतः ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्थांना आवश्यक ती मदत करण्याचा त्यांचा उद्देश असतो. त्यासाठी सुजाता आंबेरकर व विनोद मोरे आणि महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी दीपक सावंत व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्रीकांत आपटे, सचिव मनीष गांधी, खजिनदार समीर मांगले तसेच सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश कामत इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी संबंधित संस्थांचे आभार मानले व त्यांच्या सामाजिक [illegible] शुभेच्छा दिल्या.



फोंडाघाट महाविद्यालयाला देणगी देण्यात आली. (छाया: कुमार नाडकर्णी).

# फोंडाघाट महाविद्यालयाला देणगी

फोंडाघाट:

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटला कुंबळजाई देवी सामाजिक विकास संस्था कामोठे नवी मुंबई आणि सिद्धगिरी गुरुकुल फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १० जोड बाके ३५ एकेरी बाके आणि खुर्च्या देणगी म्हणून देण्यात आले.

या संस्था नेहमी सामाजिक मदत करण्यात अग्रेसर असतात. विशेषतः ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्थांच्या निकडीचा वेध घेऊन त्यांना मदत करण्याचा त्यांचा उद्देश असतो. या कामी सौ. सुजाता आंबेरकर व श्री. विनोद मोरे आणि महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी श्री. दीपक सावंत व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री. श्रीकांत आपटे, सेक्रेटरी, मनीष गांधी, खजिनदार समीर मांगले तसेच सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश कामत इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी सर्वांनी आभार मानले व त्यांच्या सामाजिक कार्याला शुभेच्छा दिल्या.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.Kankavli, Dist.Sindhudurg